पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३९७ दिनांक - २८/०५/२०२३**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन व गुन्हे शाखा युनिट-३ यांची सयुंक्त कारवाई

## खुनाच्या गुन्हयातील मुख्य आरोपी जेरबंद

दि.२७/०५/२०२३ रोजी दत्तवाडी पोलीस ठाणे हद्दीत इसम नामे सुनिल विठ्ठल मोरे,वय ५२,रा.लेन नं ३०,जनता वसाहत,पुणे याचा पहाटे कोणीतरी अज्ञात इसमाने डोक्यात दगड घालुन खुन केलेबाबत **दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१४१/२०२३ भादवि ३०२** प्रमाणे गुन्हा दाखल होता.

दाखल गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन **दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. जयराम पायगुडे तसेच गुन्हे शाखा,युनिट-३ चे प्रभारी श्री.श्रीहरी बहिरट** यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली दत्तवाडी पोलीस स्टेशन तपास पथक व गुन्हे शाखेची पथके तयार करुन,आरोपींचा शोध घेण्यास सुरवात केली.

गुन्हे शाखेने केलेले तांत्रिक विश्लेषणाव्दारे तसेच स्थानिक पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांचे हद्दीतील बातमीदारामार्फत आरोपींची नावे निष्पन्न करण्यात आली. त्यांनतर स्थानिक घटनास्थळी उपस्थित असलेला आरोपी नामे **समीर ऊर्फ विरेद्र पाडुरंग चौरे,वय ३३ वर्षे,रा. ५२, चाळ,निलायम पुला जवळ,पर्वती पायथा,पुणे** यास दि.२६/०५/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

तपासात निष्पन्न झालेल्या माहितीनुसार दुसरा आरोपी नामे **राज चंद्रकांत जाधव, वय १९ वर्षे रा. गल्ली नं.०३ मधला टप्पा, जनता वसाहत आनंद मठाजवळ पर्वती पायथा पुणे व एक विधी संघर्षित बालक यास** दि.२७/०५/२०२३ रोजी जनता वसाहात परिसरातुन त्याने गुन्हयात वापरलेल्या दुचाकी गाडीसह त्याब्यात घेण्यात आले असता,त्यांनी गुन्हयाची कबुली दिल्याने त्यातील राज जाधव यास अटक करण्यात आली आहे व विधी संघर्षितास चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपी नामे राज जाधव याचा गुन्हेगारी पुर्व इतिहास नसुन तो पहाटे पेपरचे गठ्ठे बांधायचे काम करतो. तसेच राज जाधव व विधीसंघर्षित बालक त्याचप्रमाणे मयत इसम हे एकाच परिसरात राहण्यास असुन,एकाच अरुंद रस्त्याने जाताना एकमेंकांचा धक्का लागल्याने झालेल्या शिवीगाळ व बाचा-बाचीमुळे त्याने चिडुन जाऊन,त्याच्या डोक्यात दगड घालुन खुन केल्याचे आत्तापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपींने गुन्हयात वापरलेल्या वाहनांवरुन आरोपींपर्यत पोलीस पोहचले. गुन्हयात वापरलेल्या ॲक्टीवा गाडीप्रमाणे दिसणा-या पन्नास ते साठ दुचाकी व त्यांच्या मालकांचा यादरम्यान पोलीसांनी शोध घेतला व मुख्य आरोपी शोधुन काढला. गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.जयराम पायगुडे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,मा.प्रविणकुमार पाटिल, पोलीस उप-आयुक्त,श्री.आर.राजा, सहा.पोलीस आयुक्त,सिंहगड विभाग,श्री.राजेंद्र गंलाडे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, जयराम पायगुडे, पोलीस निरीक्षक,युनिट-३,गुन्हे शाखा,पुणे,श्री.श्रीहरी बहिरट व दत्तवाडी पो स्टे चे पोलीस निरिक्षक,(गुन्हे),श्री.विजय खोमणे यांचे मार्गदर्शनाखाली दत्तवाडी पो स्टे तपास पथकातील व गुन्हे शाखेतील पोलीस उप-निरीक्षक,चंद्रकांत कामठे, पोलीस अंमलदार,संतोष क्षीरसागर, कुंदन शिंदे, पुरुषोत्तम गुन्ला, ज्ञानेश्वर चित्ते, किशोर वळे, प्रशांत शिंदे, प्रमोद भोसले, दयानंद तेलंगे पाटील, अमित सुर्वे, अनिस तांबोळी, सद्दाम शेख, नवनाथ भोसले, अमोल दबडे, अमित चिव्हे यांनी केली आहे.

